# Washim District Police

**Nature of Work** :- **Raid On IPL Satta**

**Police Station** :- **Mangrulpir**

**Date of Good Work done** :- **14/04/2022**

**Brief of the work done :-**

मंगरुळपीर येथे IPL क्रिकेट सामन्यावर सट्टा लावणाऱ्यांवर पोलिसांची धाड ; 30 आरोपींवर गुन्हा दाखल.

लोकमत

# मंगरुळपीरात क्रिकेट सट्ट्यावर धाड; ३० आरोपींवर कारवाई!

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम** : मंगरूळपीर शहरातील आयपीएल क्रिकेट सट्ट्यावर धाड टाकून स्थानिक गुन्हे शाखेच्या चमूने १२ एप्रिल रोजी ३० आरोपींवर कारवाई केली.

पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी जिल्ह्यातील अवैध धंदे करणारे व अवैधरित्या क्रिकेट सट्टा चालविणाऱ्या इसमांविरूद्ध विशेष मोहीम सुरू केली. मंगरूळपीर येथे आयपीएल क्रिकेट सट्टा सुरू असल्याची गुप्त माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव यांना मिळताच, पोलीस अधीक्षकांच्या निर्देशानुसार १२ एप्रिल रोजी मंगरूळपीर ते कवठळ रोडवरील विशाल घडीनकर यांच्या शेतात धाड टाकण्यात आली. यावेळी दोन इसम हे सीएसके विरूद्ध आरसीबी या सामन्यावर लोकांकडून मोबाईलदवारे क्रिकेट मॅचवरील प्रत्येक रन, बॉलिंग, बॅटिंग यावर जुगार खेळत असल्याचे आढळून आले. राहुल बालचरण साळुंखे व जय दयालगिर गिरी (दोघेही रा. मंगरूळपीर) यांच्याकडून सहा मोबाईल, एक स्कुटी, रोख ३,६३० रुपये असा एकूण ९९ हजार ३६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.



याप्रकरणी २५ ते ३० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, अपर पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव व चमूने पार पाडली.